सोलापूर तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २८ जानेवारी २०२६

आतील पानावर

पान २– ‘किंग खान’चं डॉन ३ मध्ये कमबॅक?
पान ३– ‘या’ बॉलीवूड अभिनेत्रीचा क्रश होता ...
पान ४– धनुष–मृणालचं होणार शुभमंगल सावधान!
पान ५– अल्लू अर्जुनच्या सिनेमात सलमान ...
पान ६ – प्रिया –उमेशच्या ट्रान्सफॉर्मेशनचं सीक्रेट ...
पान ७ – बॉलीवूडचा नवा ‘लव्ह ट्रँगल’!

# ‘धुरंधर २’मध्ये विकी कौशलची एन्ट्री?


आदित्य धर दिग्दर्शित ‘धुरंधर’ या चित्रपटाने केवळ ४७ दिवसांत भारतात ८२८.१० कोटी रुपयांची कमाई केली आहे. तर जगभरातील कमाईचा हा आकडा १२८७ कोटींपर्यंत पोहोचला आहे. ‘धुरंधर’ची सर्वत्र चर्चा सुरू असतानाच आता दोन महिन्यांनी या चित्रपटाचा सीक्वेल म्हणजेच ‘धुरंधर: द रिवेंज’ प्रदर्शित होणार आहे आणि यात अभिनेता विकी कौशलचीसुद्धा एन्ट्री होणार असल्याचं म्हटलं जात आहे. अक्षय खन्ना ‘धुरंधर २’मध्ये रहमान डकैत ही भूमिका पुन्हा साकारणार नाही. तो या चित्रपटात फक्त काही फ्लॅशबॅक सीनमध्येच दिसणार आहे. त्यामुळे चाहत्यांची थोडी निराशा होणं साहजिक आहे. मात्र, प्रेक्षकांसाठी एक आनंदाची बातमीही आहे. ती म्हणजे ‘धुरंधर २’मध्ये प्रेक्षकांना विकी कौशल पाहायला मिळणार आहे. वृत्तानुसार, अक्षय खन्ना ‘धुरंधर २’मध्ये फक्त फ्लॅशबॅक सीनमधून दिसणार आहे, तर विकी कौशल मुख्य भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येईल. यात तो ‘उरी : द सर्जिकल स्ट्राइक’मधील मेजर विहान शेरगिल यांची भूमिका साकारणार आहे. मात्र याबाबत आदित्य धरने विकीच्या एन्ट्रीबाबत सध्या तरी काहीच माहिती दिलेली नाही. ‘उरी’ची कथा २०१६ मधील असल्याने, विकीचं पात्र या चित्रपटात दाखवण्यात येणार आहे. मात्र विकी आणि रणवीर सिंह यांच्या पात्रांचा एकमेकांशी थेट सामना होतो की नाही, हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. यात काही ॲक्शन दृश्यांचाही समावेश आहे. विकीने २०२५ मध्येच ‘धुरंधर’च्या पहिल्या भागाच्या प्रदर्शनापूर्वी शूटिंग पूर्ण केले असल्याचं म्हटलं जात आहे. ‘धुरंधर २’ हा १९ मार्च रोजी प्रदर्शित होणार आहे. अक्षय खन्नाच्या पात्राचा पहिल्या भागात मृत्यू झाला होता. त्यामुळे दुसऱ्या भागात तो फक्त काही ठिकाणी दिसणार आहे आणि त्याने आपलं शूटिंगही पूर्ण केलं आहे. ‘धुरंधर’ने पहिल्या आठवड्यात २०७.२५ कोटी, दुसऱ्या आठवड्यात २५३.२५ कोटी, तिसऱ्या आठवड्यात १७२ कोटी रुपये इतकी कमाई केली आहे. तर चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या आठवड्यात अनुक्रमे १०६.५०, ५१.२५ आणि २६.३५ कोटी रुपयांची कमाई केली आहे.







# ‘किंग खान’चं डॉन ३ मध्ये कमबॅक?




## माही वीजच्या आयुष्यात नव्या व्यक्तीची एन्ट्री?

टीव्ही विश्वातील आदर्श जोडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जय भानुशाली आणि माही विज यांच्या १५ वर्षांच्या सुखी संसाराला आता पूर्णविराम मिळाला आहे. नुकतेच त्यांनी सोशल मीडियावरून घटस्फोट घेतल्याचे जाहीर केले. त्यांनी संयुक्त निवेदनात सांगितले की, आम्ही वेगळे होत आहोत, पण आमच्यात कोणताही द्वेष किंवा नकारात्मकता नाही. आम्ही शांततेला प्राधान्य देतो आणि मुलांसाठी सर्वोत्तम पालक, मित्र राहू. हे ऐकून चाहत्यांना मोठा धक्का बसला होता. माहीने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली. तिने आपला मित्र नदीमच्या वाढदिवसानिमित्त केक कापतानाचा फोटो पोस्ट केला. कॅप्शनमध्ये माहीने लिहिले, वाढदिवसाच्या शुभेच्छा त्या व्यक्तीला ज्याला मी नशिबाने नव्हे तर हृदयाने निवडलं आहे. तू माझी सुरक्षित जागा आहेस. या पोस्टने सोशल मीडियावर खळबळ उडाली. ताराने नदीमसोबतच्या फोटोसह कॅप्शन लिहिले, हॅपी बर्थडे अब्बा! मी तुमच्यावर खूप खूप खूप प्रेमकरते तुमची तारा. या फोटोत नदीमताराला कडेवर घेऊन दिसत आहे. जय भानुशाली असताना हा ‘अब्बा’ कोण?, घटस्फोटाच्या जखमा ताज्या असताना इतकी घाई का? अशा टीकात्मक कमेंट्स पोस्टवर येत आहे. माहितीनुसार, नदीम हा सलमान खान टेलिव्हिजनचा सीईओ आणि मीडिया प्रोफेशनल आहे. तो जय-माहींचा जवळचा मित्र आहे. गेल्या वर्षीही ‘फादर्स डे’ निमित्त ताराने नदीमसाठी इमोशनल पोस्ट शेअर केली होती. माहीच्या कठीण काळात नदीम तिच्या पाठीशी उभे राहिले, पण त्याला ‘अब्बा’ म्हणणे अनेकांना खटकले. या वादावर जय भानुशालीने मौन बाळगले आहे. जय आणि माहीने घटस्फोटाचं कारण स्पष्ट केलेले नाही. तरी, १५ वर्षांचं नातं संपल्यानंतर ७ दिवसांत दुसऱ्या व्यक्तीला ‘फॅमिली’ प्लेस’ म्हणणं हे अनेकांच्या पचनी पडलेले नाही.

फरहान अख्तरच्या 'डॉन ३' वर सध्या वेगवेगळे अपडेट समोर येत आहेत. गेल्या वर्षी त्याने रणवीर सिंह यावेळी 'डॉन ३'मध्ये असणार अशी घोषणा केली होती. शाहरुख खानने सिनेमासाठी नकार दिल्याची चर्चा झाली. मात्र नुकतंच रणवीरने 'धुरंधर' हा ब्लॉकबस्टर सिनेमा दिला आणि नंतर अचानक त्यानेही 'डॉन ३' सोडला. फरहान किंवा रणवीर दोघांनीही अद्याप यावर बोलणं टाळलं आहे. त्यातच आता शाहरुखच 'डॉन' साकारणार अशी चर्चा रंगली आहे. मात्र यासाठी शाहरुखने फरहानसमोर एक अट ठेवली आहे. शाहरुखला एकेकाळी 'डॉन' अणि 'डॉन २' मुळे कमालाची प्रसिद्धी मिळाली होती. या सिनेमांनी त्याच्या करिअरला वेगळी दिशा दिली होती. रोमँटिक हिरोच नाही तर तो सुपरहिट व्हिलनही बनला होता. मात्र आता 'डॉन ३'मध्ये नवा डॉन असावा अशी त्याची इच्छा होती आणि त्याने फरहानला ती बोलूनही दाखवली होती. फरहानने रणवीरची निवड केली. पण रणवीरने सिनेमा सोडल्यानंतर फरहान पुन्हा शाहरुखकडेच गेल्याची चर्चा आहे. यावर शाहरुखने एका अटीवर सिनेमा करण्यास होकार दिला आहे. रिपोर्टनुसार, शाहरुख खान 'डॉन ३' मध्ये काम करण्यासाठी तयार झाला आहे. तो आपल्या आयकॉनिक भूमिकेत परत येतोय. मात्र त्याने फरहानसमोर एक अट ठेवली आहे. शाहरुखचा मेजर कमबॅक असलेला सिनेमा 'जवान'चा दिग्दर्शक टलीलाही 'डॉन ३'प्रक्रियेत सहभागी करुन घेण्याची अट शाहरुखने ठेवली आहे. सिनेमाची स्केल वाढवण्यासाठी शाहरुखने टलीचं नाव सुचवलं आहे. अद्याप यावर कोणताही निर्णय झालेला नाही. मेकर्स आणि कलाकारांकडून याबाबत अधिकृत माहिती आलेली नाही. शाहरुखला पुन्हा 'डॉन'च्या भूमिकेत पाहण्यासाठी त्याचे चाहते तर उत्सुक आहेतच. पण आता फरहान त्याची ही अट मान्य करतो का हे पाहणं महत्वाचं आहे. २०२३ पूर्वी शाहरुखचे अनेक सिनेमे सलग फ्लॉप झाले होते. २०२३ साली टलीच्या 'जवान'सिनेमामुळे त्याचं दमदार कमबॅक झालं होतं. शाहरुखचा टलीवर विश्वास असल्याचंच यातून दिसून येतं.

# ‘गांधी टॉक्स’मध्ये विजय सेतुपति



‘दिग्दर्शक किशोर पांडुरंग बेलेकर स्वत:चा बहुप्रतीक्षित चित्रपट ‘गांधी टॉक्स’द्वारे प्रेक्षकांना मूकपटांची ओळख करून देणार आहे. निर्मात्यांनी याचा टीजर जारी केला आहे. हा चित्रपट ३० जानेवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या कहाणीचे लेखन आणि दिग्दर्शक बेलेकरनेच केले असून याला अकॅडमी पुरस्कार विजेते संगीतकार ए. आर. रहमान यांचे संगीत लाभले आहे. गांधी टॉक्स एक सायलेंट ब्लॅक कॉमेडी असून यात एका पात्राच्या आर्थिक गरजा आणि त्याचा आसपासच्या लोकांवर पडणारा प्रभाव दर्शविण्यात आला आहे. महादेव नावाच्या एका युवा बेरोजगार पदवीधराची कहाणी असून तो नोकरी मिळविण्यासाठी अत्यंत आतुर आहे. त्याची भेट एक व्यापारी (अरविंद स्वामी) आणि एका चोरासोबत (सिद्धार्थ जाधव) होते. या कहणीत शांतता शब्दांपेक्षा अधिक प्रभावी आहे. मूकपट असल्याने चित्रपटात संगीत आणि हावभावानेच पूर्ण कहाणी व्यक्त करण्यात आली आहे. ‘गांधी टॉक्स’ चित्रपटात विजय सेतुपति, अरविंद स्वामी, अदिति राव हैदरी आणि सिद्धार्थ जाधव दिसून येणार आहे. टीझरमध्ये या कलाकारांच रंजक झलक दिसून येत आहे. विजय याच्या भूमिकेत हातात शस्त्र पकडून दाखविण्यात आले आहे. तर अदिति ही बाल्कनीत उभी असल्याचे दिसून येते.

# 'या' बॉलीवूड अभिनेत्रीचा क्रश होता अक्षय खन्ना

'छावा' आणि नंतर 'धुरंधर'मधील रहमान डकैत या भूमिकेमुळे अक्षय खन्नाने अनेकांची मनं जिंकली. त्याच्या लूकची, संवादांची प्रेक्षकांमध्ये मोठ्या प्रमाणात चर्चा होऊ लागली. सोशल मीडियावरही अभिनेत्याचे फोटो व व्हिडीओ व्हायरल झाले. कलाकार मंडळींनीही त्याच्या कामाचं कौतुक केलं.

अक्षय खन्नाने जोरदार कमबॅक केला अशी चर्चा त्याच्या चाहत्यांमध्ये आहे. अक्षय खन्ना कायमच विविध कथानक असलेल्या चित्रपटांतून प्रेक्षकांसमोर आला आहे. त्याने कायम त्याच्या अभिनयशैलीने प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. पण तुम्हाला माहीत आहे का, अक्षय खन्ना फक्त प्रेक्षकांना आवडत नाहीये, तर त्याने कलाकारांनाही भूरळ घातली असून यापूर्वीसुद्धा तो लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री करिना कपूरचा क्रश होता आणि तिला तो प्रचंड आवडायचा. करिना कपूरच्या 'करिना कपूर द स्टाईल डायरी ऑफ बॉलीवूड दिवा' या रोकेल पिंटो यांनी लिहिलेल्या पुस्तकात करिनाने अक्षय खन्ना तिला आवडायचा असं लिहिलं आहे. करिना त्यावेळी लहान होती आणि तिची बहीण करिश्माबरोबर सेटवर जायची. या पुस्तकात लिहिलंय की, माझ्यामध्ये आणि लोलोमध्ये सहा वर्षांचं वयाचं अंतर असल्याने तिने चित्रपटांत काम करायला सुरुवात केली तेव्हा मी लहान होते. पण, मी तिला सोबत म्हणून सेटवर जायचे. तिच्याबरोबर अनेक अभिनेत्यांनी स्क्रीनवर रोमान्स केला आहे. आम्ही तेव्हा आमच्या आवडत्या नायकांपासून खूप आनंदी व्हायचो. या सर्व नायकांपैकी एक नायक करिनाला खूप आवडला होता, ज्याबद्दल तिने स्वत: कबुलीही दिली होती. तिने पुढे अक्षय खन्ना माझा क्रश होता आणि त्याला पाहिल्यानंतर आणि तो जेव्हा माझ्या आजूबाजूला असायचा, तेव्हा मी खूप आनंदी असायचे असं लिहिलं आहे. दरम्यान, अक्षय खन्ना 'धुरंधर २'मधून पुन्हा एकदा रहमान डकैतच्या भूमिकेतून पाहायला मिळणार आहे. या चित्रपटाचा सीक्वल १९ मार्च रोजी प्रदर्शित होणार आहे, तर करिना कपूर येत्या काळात 'दायरा' या चित्रपटातून झळकणार आहे. मेघना गुलझार यांनी याचं दिग्दर्शन केलं आहे.



# नेहाने केली ब्रेकअपची घोषणा?

गायिका नेहा कक्करने कामापासून ब्रेक घेतला आहे. तिने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करून याची घोषणा केली. तिने सांगितले की ती काही काळासाठी काम आणि जबाबदाऱ्यापासून ब्रेक घेत आहे. त्यानंतर तिने काही वेळातच पोस्ट डिलीट केली. तथापि, तिच्या पोस्टचे स्क्रीनशॉट व्हायरल होत आहेत. नेहा कक्करने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक पोस्ट शेअर करून कामावरून ब्रेक घेतल्याची घोषणा केली आहे. तथापि, तिच्या इंस्टाग्रामच्या पोस्ट किंवा स्टोरीवर सध्या कोणतेही अपडेट नाहीत. असे म्हटले जात आहे की गायिकेने पोस्ट शेअर केल्यानंतर काही मिनिटांतच ती डिलीट केली, परंतु त्याचे स्क्रीनशॉट व्हायरल होत आहेत. तिने भावनिक त्रास, नकारात्मकता आणि उद्योगातील दबाव हे तिच्या ब्रेकचे कारण असल्याचे सांगितले. हे लक्षात घेण्यासारखे आहे की नेहाने ब्रेक घेण्याची ही पहिलीच वेळ नाही. २०२० मध्ये, तिने घराणेशाहीच्या वादात ब्रेक घेण्याची घोषणा केली. नुकतेच तिने आणखी एक ब्रेक जाहीर करून चाहत्यांना आश्चर्यचकित केले. तिने लिहिले, जबाबदाऱ्या, नातेसंबंध, काम आणि मी सध्या ज्या गोष्टींबद्दल विचार करू शकते. त्यापासून ब्रेक घेण्याची वेळ आली आहे. मला खात्री नाही की मी परत येईन की नाही. धन्यवाद. नेहाने पापाराझी आणि चाहत्यांना तिच्या गोपनीयतेचा आदर करण्याची विनंती केली आहे. गायिकेने लिहिले, मी पापाराझी आणि चाहत्यांना विनंती करते की माझे फोटो कुठेही टिपू नका. मला आशा आहे की तुम्ही माझ्या गोपनीयतेचा आदर कराल आणि मला या जगात मुक्तपणे जगू द्याल. कृपया कॅमेरे नाहीत. मी तुम्हाला विनंती करते. नेहाच्या ब्रेकच्या घोषणेवर नेटिझन्सकडून प्रतिक्रिया आल्या आहेत. काही वापरकर्ते याला पीआर स्टंट म्हणत आहेत, तर काही तिचे समर्थन करत आहेत.



# माझी बदनामी केली जातेयं...

गोविंदा आणि त्याची पत्नी सुनीता आहूजा यांच्यातील नात्यात दुरावा आल्याच्या चर्चांनी गेल्या काही दिवसांपासून जोर धरला होता. घटस्फोट आणि अफेअरच्या अफवांना उधाण आले असतानाच, गोविंदाने या सर्व प्रकरणावर सविस्तर भूमिका मांडली. 'माझ्या विरोधात षडयंत्र रचले जात असून माझ्या कुटुंबाचाच माझ्याविरुद्ध वापर केला जात आहे', असा खळबळजनक दावा गोविंदाने केला आहे. गोविंदाने म्हटलं की, माझ्याविरोधात अनेक वर्षांपासून एक कट रचला जात आहे. हे सगळं नशिबातच आहे, असं समजून मी १५ वर्षांहून अधिक काळ शांत राहिलो. मी शांत राहतो म्हणून लोकांना वाटतं की मी खरोखरच वाईट आहे. म्हणूनच आता मी बोलतोय. मला आधीच सांगितलं होतं की, माझ्या कुटुंबीयांचा माझ्याविरोधात वापर केला जाईल. आधी माणसाला कुटुंबापासून तोडायचं, मग समाजापासून गोविंदाने भाचा कृष्णा अभिषेकबाबत बोलताना सांगितले की, जर तुम्ही कृष्णाचा टीव्ही शो बघितला, तर तुम्हाला समजेल की, काही लेखक त्याला माझ्याविरुद्ध बोलायला सांगतात. जेणेकरून माझी बदनामी होईल. पण मी त्याला सांगितले आहे की, त्याचा वापर करून माझी बदनामी केली जात आहे आणि त्याला असं न करण्याचा सल्ला सुद्धा दिला आहे. यापुढे गोविंदाने नावे न घेता आरोप केला की, जेव्हा एखादा कलाकार खूप लोकप्रिय होतो, तेव्हा त्याची प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न केला जातो. दरम्यान, गोविंदानं ही प्रतिक्रिया देण्यामागचं कारणं म्हणजे पत्नी सुनीता यांनी त्यांच्या अफेअरबद्दल नुकत्याच एका मुलाखतीत वक्तव्य केलं होतं. एका मुलाखतीत सुनीता यांनी २०२५ हे वर्ष माझ्यासाठी खराब गेलं. माझं कौटुंबिक आयुष्य विस्कळीत झालं. प्रत्येक गोष्टीला एक वय असतं. ६३ व्या वर्षी अशा गोष्टी ऐकायला मिळणं चांगलं नाही. विशेषतः जेव्हा मुलं मोठी झालेली असतात. २०२६ मध्ये देवाने गोविंदाला सद्बुद्धी द्यावी, हीच इच्छा आहे असं म्हटलं होतं.





# धनुष-मृणालचं होणार शुभमंगल सावधान!

फेब्रुवारी महिना म्हणजे प्रेमाचा महिना. या महिन्यात अनेक लव्हबर्ड्स लग्न करतात. बॉलिवूडमध्येही लग्नाचे वारे पाहत आहेत. विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना ही लाडकी जोडी पुढच्या महिन्यात लग्नबंधनात अडकणार आहे. तर दुसरीकडे काल अचानक धनुष आणि अभिनेत्री मृणाल ठाकुरच्या लग्नाची बातमी पसरली.

दोघंही फेब्रुवारीत लग्न करणार असल्याचं समोर आलं आणि चाहत्यांना धक्काच बसला. आता यामागचं खरं सत्य समोर आलं आहे. अभिनेत्री मृणाल ठाकूरच्या जवळच्या व्यक्तीने स्पष्ट केलं की या सगळ्या अफवा आहेत. मृणालच्या निकटवर्तियाने सांगितलं की, मृणाल पुढच्या महिन्यात लग्न करणार नाही. काहीही कारण नसताना या अफवा पसरल्या आहेत. सध्या मृणालकडे अनेक प्रोफेशनल कमिटमेंट्स आहेत. अशात पुढील महिन्यात तिचं लग्न होणार हे शक्यच नाही. तिचं पूर्ण लक्ष करिअरवर आहे. धनुषचा सिनेमा 'तेरे इश्क मे'च्या वेळी मृणालही त्याच्यासोबत दिसली होती. धनुष, क्रिती सेनन त्यांच्या मित्रपरिवारासोबत होते तेव्हा मृणालही त्यात होती. शिवाय धनुषने मृणालला स्क्रीनिंगवेळी खास आमंत्रण दिलं होतं. त्यावेळीही दोघं सोबत दिसले होते. सोशल मीडियावरही मृणालने धनुषचं कौतुक केलं ज्यावर अभिनेत्यानेही प्रतिक्रिया दिली. यावरुनच त्यांच्या अफेअरच्या चर्चांना सुरुवात झाली होती. धनुषचं २००४ मध्येच रजनीकांतची लेक ऐश्वर्यासोबत लग्न झालं होतं. त्यांना यात्रा आणि लिंगा ही दोन मोठी मुलं आहेत.

२०२४ साली धनुष आणि ऐश्वर्याने घटस्फोट घेतला. त्यांचा २० वर्षांचा संसार मोडला. अशात दोन मुलांचा बाबा असलेल्या धनुषसोबत मृणालच्या अफेअरच्या चर्चांमुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.

प्रयागराज कुंभमेळ्यादरम्यान माला आणि मोती विकून प्रसिद्ध झालेली मोनासिला पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. मोनालिसाचा चित्रपट 'द डायरी ऑफ मणिपूर'चे पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. या चित्रपटात ती एका गावातील युवतीच्या भूमिकेत आहे. पोस्टरमध्ये ती चित्रपटाच्या नायकासोबत दिसून येते. मोनालिसा कुंभमेळ्यादरम्यान माला विकत असताना कुणीतरी तिचे छायाचित्र टिपले, तिचे हास्य, तिचे डोळे आणि साधेपणाने युक्त सौंदर्य पाहून लोकांचे लक्ष वेधले गेले. तिचे छायाचित्र व्हायरल झाले आणि तिच्या जीवनाने एक नवे वळणही घेतले. स्वत:च्या पहिल्या गीतानंतर मोनालिसाला सनोज मिश्रा यांचा चित्रपट 'द डायरी ऑफ मणिपूर'साठी करारबद्ध करण्यात आले होते. ती आता इव्हेंट्स आणि ब्रँड प्रमोशनमध्येही भाग घेत आहे. आता मुंबईत स्वत:चे घर खरेदी करण्याचे तिचे स्वप्न आहे.

# 'द डायरी मणिपूर' मध्ये मोनालिसा



# शाहिद कपूर 'असा' जपतो स्वत:चा फिटनेस



बॉलीवूड अभिनेता शाहिद कपूर हा केवळ त्याच्या अभिनयासाठीच नव्हे, तर फिटनेससाठीही तितकाच ओळखला जातो. घरात असो किंवा शूटिंगच्या सेटवर, तो साकारत असलेल्या प्रत्येक भूमिकेला योग्य तेवढं महत्त्व देतो. यामुळे त्याच्या अभिनयासह फिटनेसचीदेखील चर्चा होताना दिसते. अशातच त्यानं त्याचा फिटनेस रुटीनबद्दल माहिती दिली आहे. मुलाखतीत शाहिद आपल्या अभिनय प्रवास, आहार आणि दिनचर्येबद्दल मोकळेपणाने बोलला. यावेळी त्यानं त्याच्या रोजच्या व्यायामाच्या टिप्स तसंच आहाराबद्दलची माहितीसुद्धा शेअर केली. तसंच रोजच्या थकाथकीच्या जीवनात असलेलं झोपेचं महत्त्वदेखील विशद केलं. फिटनेसबद्दल अभिनेता म्हणाला, माझ्यासाठी फिटनेस म्हणजे जास्त कष्ट नव्हे, तर सातत्य. माझ्या व्यायामात साधारणपणे फंक्शनल ट्रेनिंग, ताकद वाढवणारे व्यायाम आणि शरीर लवचिक ठेवणारे एक्सरसाइज असतात. त्यामुळे शरीर तंदुरुस्त राहतं. मी सकाळी व्यायाम करणं पसंत करतो, त्यामुळे दिवसाची सुरुवात चांगली होते. शक्य असेल तेव्हा थोडं कार्डिओ करतो. जेणेकरून कंटाळा येत नाही. स्वत:ची दिनचर्या सांगत शाहिद म्हणाला की, मला माझी सकाळ साधी आणि शांत असलेली आवडते. उठल्यानंतर मी थोडा वेळ श्वसनाचे व्यायाम करतो. त्यामुळे शरीर जागं होतं आणि दिवसाची सुरुवात सकारात्मक होते. जर शूटिंग असेल तर मी उपाशीपोटी सकाळीच व्यायाम करतो. त्यामुळे सेटवर जाण्यापूर्वी किमान साडेतीन तास आधी उठतो. यानंतर त्यानं झोपेचं महत्त्वही सांगितलं. तो म्हणाला, झोप हा आयुष्याचा फारच दुर्लक्षित भाग आहे, असं मला वाटतं. बहुतेक वेळा मी सुमारे सहा तास झोप घेतो. मात्र ते शूटिंगच्या वेळापत्रकावर अवलंबून असतं. सलग शूटिंग असेल तर झोप कमी होते, पण मिळेल तेव्हा ती भरून काढण्याचा मी प्रयत्न करतो. पुरेशी विश्रांती घेतली तर फक्त शरीरच नव्हे, तर मनही ताजंतवानं राहतं. यापुढे त्याने आहाराबद्दल सांगितलं की, मी शाकाहारी असल्यामुळे माझा आहार आपोआपच संतुलित राहतो. त्यात भरपूर पालेभाज्या, भाजीपाला आणि डाळी यांचा समावेश असतो. विशेषतः साधं, घरचं जेवण खाणं पसंत करतो. मी जड आणि अपायकारक पदार्थ टाळतो आणि रात्री उशिरा खाणंही टाळतो, कारण त्याचा परिणाम माझ्या शरीरावर होतो. मी थोडं- थोडं आणि वेळच्या वेळी खातो. त्यामुळे शरीर हलकं वाटतं.

# अल्लू अर्जुनच्या सिनेमात सलमान घेणार एन्ट्री!



दाक्षिणात्य सुपरस्टार अल्लू अर्जून आणि रश्मिका मंदाना स्टार पुष्पा- द राइज, पुष्पा-द रुल या दोन्ही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. या चित्रपटांनी देशातचं नाहीतर जगभरातील प्रेक्षकांचं प्रेम मिळालं. सुकुमार यांच्या या फ्रँचाईझीचा चाहतावर्ग फार मोठा आहे. अशातच आता या चित्रपटाच्या तिसर्या भागाबद्दल मोठी अपडेट समोर आली आहे. त्यामुळे सिनेरसिकांचा आनंद द्विगुणीत झाला आहे. अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा ३: द रॅम्पेज' चित्रपट तीन वर्षांनी प्रेक्षकांच्या भेटीस येणार असल्याचं म्हटलं जात आहे. त्यात आता या फ्रेंचायझीमध्ये बॉलिवूडचा भाईजान म्हणजे सलमान खानची एन्ट्री होणार असल्याची माहिती मिळते आहे. सलमान खान मिश्री मूव्ही मेकर्ससोबत काम करणार असल्याच्या अफवा बर्याच काळापासून पसरत आहेत. 'पुष्पा-द रुल' मध्ये अभिनेता फहाद फॉसिलने साकारलेला खलनायक चांगला गाजला होता. मात्र, या दुसर्या पार्टमध्येच या पात्राचा शेवट दाखवण्यात आला आहे. त्यानंतर तेव्हापासून, तिसर्या भागात विजय देवरकोंडा खलनायकाच्या भूमिकेत दिसणार असल्याचे तर्कवितर्क लावण्यात आले होते. मात्र, आता सलमान खान विजयचा पत्ता कट करणार असल्याचं बोललं जातंय.'पुष्पा ३' मध्ये सलमान एक कॅमिओ असणार आहे. ज्यात त्याच्या पात्राचं नाव सुल्तान असल्याचंही कळतंय. परंतु, या चर्चांवर सलमान किंवा 'पुष्पा ३: द रॅम्पेज' सिनेमाच्या निर्मात्यांची कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. मिडिया रिपोर्टनुसार, निर्माते 'पुष्पा ३: द रॅम्पेज' मध्ये सलमानच्या एन्ट्रीबद्दल प्लॅनिंग करत आहेत. तिसर्या भागात या चित्रपटात सलमान खान एक करोडपती, धूर्त आणि व्या[illegible]क

# अक्षय कुमारच्या चित्रपटात राशीची वर्णी

अनीज बजमी हे अक्षय कुमारला सोबत घेत एक चित्रपट निर्माण करणार असून यात विद्या बालनही दिसून येणार आहे. जवळपास ६ वर्षांनी अक्षय आणि विद्या ही जोडी प्रेक्षकांना पुन्हा मोठ्या पडद्यावर पाहता येणरा आहे. तर आता या चित्रपटात आणखी एका अभिनेत्रीची एंट्री झाली आहे. चित्रपटात राशी खन्नाची वर्णी लागली असून याचे चित्रिकरण अत्यंत लवकरच सुरू होणार आहे. निर्मात्यांनी राशीच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून तिचा १२० बहादुर चित्रपटातील दमदार अभिनय पाहून चित्रपटाची टीम प्रभावित झाली आहे. तर यापूर्वी याकरता दिशा पाटनी आणि फातिमा सना शेख यांचे नाव चर्चेत होते असे समजते. अनीस आणि अक्षय हे अनेक वर्षांनी एकत्र येत असल्याने चाहते उत्सुक आहेत. दोघांनी यापूर्वी वेलकम यासारखा हिट चित्रपट दिला आहे. तर अक्षय सध्या स्वत:चा आगामी चित्रपट भूत बंगलाच्या प्रदर्शनाच्या तयारीत आहे. हा चित्रपट १५ मेपर्यंत प्रदर्शित होऊ शकतो. याचबरोबर त्याचा आणखी एक चित्रपट वेलकम टू द जंगल देखील चालू वर्षात झळकणार आहे.



# साई पल्लवी करणार बॉलीवूडमध्ये पदार्पण

आमिर खान हा त्याच्या चित्रपटांमुळे चर्चेत असतोच; याबरोबरच त्याच्या खासगी आयुष्यामुळेदेखील तो चर्चेत असतो. आता आमिर खानचा मोठा मुलगा जुनैद खान एका नवीन चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. एक दिन या चित्रपटातून जुनैद खान प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटातून लोकप्रिय दाक्षिणात्य अभिनेत्री साई पल्लवीदेखील बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. साई पल्लवीने तेलुगू आणि तमिळ चित्रपटांतून प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला. हा एक रोमँटिक चित्रपट आहे. यामध्ये जुनैद खानने रोहन ही भूमिका साकारली आहे, तर साई पल्लवीने मीरा ही भूमिका साकारली आहे. ६८ सेकंदांच्या संपूर्ण टीझरमध्ये रोहन मीराचे कौतुक करत राहतो. टीझरच्या शेवटी मीरा म्हणते की चित्रपटात किती जादू दाखविली जाते, पण खरे आयुष्य चित्रपटांसारखे जादुई नसते. तर रोहन जादू अस्तित्वात असल्याचे म्हणतो. टीझरमधील मीरा आणि रोहन यांची केमिस्ट्री लक्ष वेधून घेत आहे. त्यांचे लूक, त्यांच्यातील प्रेम, गोष्ट, पार्श्वसंगीत या सर्वच गोष्टी लक्ष वेधून घेत आहेत. चित्रपटाची निर्मिती आमिर खानच्या प्रोडक्शन हाऊसने केली आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन सुनील पांडे यांनी केले आहे, तर स्नेहा देसाई आणि स्पंदन मिश्रा यांनी चित्रपटाची पटकथा लिहिली आहे. १ मे २०२६ ला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. एक दिन हा चित्रपट साई पल्लवीचा बॉलीवूडमधील पदार्पणाचा चित्रपट असला तरी ती आणखी एका बॉलीवूड चित्रपटात दिसणार आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित रामायण या चित्रपटात प्रमुख भूमिकेत ती दिसणार आहे. ती सीता ही भूमिका साकारणार आहे. या चित्रपटात रणबीर कपूर, सनी देओल, विवेक ओबेरॉय हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. २०२६ च्या दिवाळीत हा चित्रपट प्रदर्शित होणार असल्याचे म्हटले जात आहे. जुनैदचा हा तिसरा चित्रपट आहे. त्याने महाराज या नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या चित्रपटातून पदार्पण केले आणि त्यानंतर खुशी कपूरसोबतच्या लव्हयापा या चित्रपटात तो दिसला. या चित्रपटानंतर जुनैद आणि खुशी यांच्यावर मोठ्या प्रमाणात टीका झाली होती. आता एक दिन हा चित्रपट कसा असणार, त्याला प्रेक्षकांचे प्रेम मिळणार का हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.




# प्रिया -उमेशच्या ट्रान्सफॉर्मेशनचं सीक्रेट समोर

मराठमोळी अभिनेत्री प्रिया बापट नेहमीच आपल्या अभिनय आणि फिटनेसमुळे चर्चेत असते. काही दिवसांपूर्वीच प्रिया आणि उमेश यांचं फिटनेस ट्रान्सफॉर्मेशन चर्चेत आलं होतं. त्यांच्या फोटोंनी सोशल मीडियावर अक्षरशः धुमाकूळ घातला होता. अशातच आता तिने या ट्रान्सफॉर्मेशनचं सीक्रेट सांगितलं आहे. नव्या वर्षाची सुरुवात होताच प्रिया बापट आणि उमेश कामत यांनी जिममधले फोटो शेअर केले होते. हे फोटो पाहून चाहत्यांसह सर्वांनाच धक्का बसला. त्यांचं हे ट्रान्सफॉर्मेशन पाहून अनेकजण थक्कच झाले. अनेकांना हे फोटो एआयने बनवलेले आहेत की काय असंही वाटलं. पण हे फोटो खरेखुरे आहेत. दोघांनी नव्या वर्षात हे ट्रान्सफॉर्मेशन केलं असून आता प्रियाने स्वत:च या फोटोंमधील ट्रान्सफॉर्मेशनचं गुपित सांगितलं आहे.

फिटनेस ट्रान्सफॉर्मेशनसाठी अनेक दिवस प्रयत्न करावे लागतात. पण शेवटी त्याचे चांगले परिणाम नक्कीच दिसतात, असे प्रिया आपल्या फिटनेस प्रवासाबद्दल सांगते. एका मुलाखतीत तिनं तिच्या फिटनेसच्या प्रवासाचा अनुभव शेअर केला. प्रिया सध्या तिच्या एका मराठी वेबसीरिजचे शूट पूर्ण करत आहे. मात्र आगामी भूमिकेसाठी ती फिटनेसवर खूप मेहनत घेत असल्याचे ती सांगते. सध्याच्या भूमिकेसाठी मला जसे आहे तसेच राहणे गरजेचे होते. पण जानेवारीच्या शेवटी सुरू होणाऱ्या पुढील प्रोजेक्टसाठी ही मेहनत नक्कीच कामी येईल, कारण ती भूमिका तशीच आहे. मला फक्त त्या व्यक्तिरेखेत फिट बसायचं आहे. खरंतर मला अनेक ॲक्शन रोल्स करायची इच्छा आहे, असे ती म्हणते. जिममध्ये सातत्याने जाण्याचे श्रेय प्रिया तिचा नवरा आणि अभिनेता उमेश कामतला देते. गेल्या दहा वर्षांपासून मी नियमित वर्कआउट करते, त्याचं पूर्ण श्रेय माझ्या फिटनेसवेड्या नवऱ्याला जातं, असे ती सांगते. ॲब्सवर काम करण्याबद्दल ती म्हणते, ॲब्स दाखवण्याचा विचार कधीच केला नव्हता. पण ॲब्स दिसायला लागल्यावर फिटनेससाठी अजून जास्त प्रेरणा मिळते. शरीर लगेच बदलत नसेल तर निराश होऊ नये, कारण यासाठी वेळ लागतो. यात शॉर्टकट नसतात. आपल्या फिटनेस रुटीनबद्दल प्रिया म्हणते, याआधी दोन वेगवेगळ्या प्रोजेक्टसाठी मी सुमारे १० किलो वजन वाढवलं होतं आणि नंतर ते कमीही केलं. पण यावेळी यावेळी मला माझ्या स्नायूंवर काम करावं लागलं आणि ॲब्सही परफेक्ट शेपमध्ये आणावे लागले. यानंतर तिनं स्क्रीनवर फिट दिसणं एक नवीन अनुभव असल्याचंदेखील सांगितलं.

ॲब्सही परफेक्ट शेपमध्ये आणावे लागले. प्रिया म्हणाली, जेव्हा फोटोशूट करण्याचा विचार केला, तेव्हा माझ्या मनात एकच गोष्ट होती. ती म्हणजे मी चांगली आणि आनंदी दिसायला हवी. एक अभिनेत्री म्हणून मला हे खूप महत्त्वाचं वाटलं. अभिनय म्हणजे फक्त संवाद बोलणं नाही, तर यात शारीरिक आणि मानसिक तयारीही तितकीच गरजेची असते. आव्हाने स्वीकारणं, वेगळं दिसणं आणि भूमिकेसाठी गरज असेल तर शारीरिक बदल करणं हे कलाकाराने शिकायलाच हवं.






# तिघी चा भावस्पर्शी टीझर प्रदर्शित


आई आणि मुलींचं नातं हे केवळ रक्ताचं नसून, ते अनुभव, आठवणी, संस्कार आणि न बोललेल्या भावनांनी विणलेलं असतं. कधी अतूट जिव्हाळ्याचं, तर कधी न व्यक्त झालेल्या अपेक्षांमुळे निर्माण झालेल्या अंतराचं तरीही अंतर्मनाने कायम एकमेकांशी घट्ट बांधलेलं. या नात्याच्या अशाच नाजूक, हळुवार आणि खोल छटा उलगडणारा 'तिघी' हा आगामी मराठी चित्रपट आहे. या चित्रपटाचा भावस्पर्शी टीझर नुकताच प्रदर्शित झाला असून, त्याने प्रेक्षकांच्या मनाला अलगद स्पर्श केला आहे.

अवघ्या काही क्षणांच्या या टीझरमधून एका घरातल्या तीन स्त्रियांच्या भावविश्वाची प्रभावी झलक अनुभवायला मिळते. आई आणि तिच्या दोन मुली यांच्यातील दुरावा, न बोललेल्या भावना, तणाव, आठवणी आणि तरीही त्या सगळ्याच्या पलीकडे असलेले प्रेम हे सगळं अतिशय वास्तवदर्शी पद्धतीने टीझरमध्ये मांडण्यात आलं आहे. कोणताही भडकपणा न करता, शांततेतून उलगडणार्या भावनांचा हा प्रवास प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडतो. 'आईचं घर. हजार आठवणी.' ही चित्रपटाची टॅगलाईनच त्याचा आत्मा सांगून जाते. आठवणींनी भरलेलं घर आणि त्या घरातल्या 'तिघीं'चं अंतर्मन हा या कथेचा केंद्रबिंदू आहे. घर हे केवळ वास्तू नसून, तिथे साठलेल्या आठवणी, न बोललेले संवाद आणि मनातल्या कोपऱ्यात दडलेल्या भावना यांचं प्रतिबिंब ठरतं आणि हेच 'तिघी' ठळकपणे मांडतो. चित्रपटाच्या दिग्दर्शिका जीजिविषा काळे म्हणतात, आई आणि मुलीचं नातं अनेकदा शब्दांपलीकडचं असतं.

प्रेम व्यक्त होत नाही, ते जाणवतं. वेदना बोलल्या जात नाहीत, त्या समजल्या जातात. 'तिघी'मधून आम्ही अशाच न बोललेल्या संवादांचा आणि न दिसणाऱ्या भावनांचा प्रवास दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. हा चित्रपट प्रत्येक स्त्रीच्या मनातल्या एका कोपऱ्याला नक्कीच स्पर्श करेल. या चित्रपटात भारती आचरेकर, सोनाली कुलकर्णी आणि नेहा पेंडसे बायस यांच्या प्रमुख भूमिका असून सुप्री मीडिया प्रस्तुत आणि कोक्लिको पिक्चर्स निर्मित 'तिघी' या चित्रपटाची कथा व दिग्दर्शन जीजिविषा काळे यांनी केले आहे. चित्रपटाची निर्मिती निखिल महाजन, सुहृद गोडबोले, स्वप्निल भंगाळे आणि नेहा पेंडसे बायस यांनी केली आहे. आई- मुलींच्या नात्याकडे वेगळ्या, प्रगल्भ आणि संवेदनशील नजरेतून पाहाणारा 'तिघी' हा चित्रपट येत्या ६ मार्च रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

**'आनेवाला पल, जानेवाला है हो सके तो इसमे जिंदगी बिता दे पल ये जो जानेवाला है...' १९७९ सालच्या 'गोलमाल' चित्रपटात गुलजार यांनी काळाचा महिमा उद्धृत केलेले हे अर्थपूर्ण गीत आहे. किती साधे शब्द! तसे पाहिले तर मोजक्याच शब्दांची उलथापालथ केली असूनही शब्द अर्थहीन होत नाही. 'एक बार वक्त से लम्हा गिराखवहाँ दास्ता गिरी लम्हा नही...' यांसारख्या अंतर्यात काळाच्या विरळपणावर भाष्य आहे. दिग्गज संगीतकार आर. डी. बर्मन (पंचमदा) यांनी जरा हटके वाट शोधणार्‍या संदेशात्मक चित्रपटांसाठीच गुलजार यांची निवड केली व त्यांच्या काव्याला संगीताच्या देव्हाऱ्यात बसविले.**

# काळाच्या पुढचा गीतकार: गुलजार



'मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा है वो राख बुझा दो, मेरा वो सामान लौटा दो' १९८७ सालच्या 'इजाजत'साठी गुलजार यांनी हे गाणे पंचमदा यांना दिले. हे गद्यरूपी गाणे वाचून ते वैतागले. गुलजार ठामपणे म्हणाले, पडद्यावरील प्रसंगात याच ओळी नायिकेच्या भावना व्यक्त करू शकतील. झालेही तसेच. या गद्यमय गाण्यात अविश्वसनीय होत चाललेल्या समाजात मानसिक स्वास्थ सावरून तयार होणार्‍या स्त्रीची अवस्था दर्शविली आहे. ही स्त्री नायिकेच्या समर्पणाला विसरायला सांगते. प्रेमातील उत्सर्ग तिच्यासाठी अर्थहीन असतो. 'चप्पा चप्पा चरखा चले औनी बौनी आरिया तेरी बौनी बौनी बेरिया तले' १९९६ सालच्या 'माचीस' चित्रपटातील या गाण्यात पंजाबम धील हिमाच्छादित प्रदेशातील बोली भाषेचा वापर करून वास्तवता प्रदान केली आहे. ऐंशीच्या दशकातील पंजाबमधील दहशतवादाच्या पृष्ठभूमीवर चरख्याचा वापर, विद्रोह, आत्मनिर्भरता व आपल्या अधिकारासाठी संघर्षाचे प्रतीक म्हणून केला आहे.

१९७८ सालच्या 'घर' चित्रपटातील या रोम्यांटिक गाण्यात गुलजार यांनी प्रेमाचे विविध रंग वापरले आहे. तेवढ्याच उत्कंठतेने नायिका उत्तरते- 'आपके आंखोमें कुछ महेके हुये थे राज है...' चपखल शब्द योजनेतून उत्कट प्रेमभावना व्यक्त होणाऱ्या आशयघन रचना गुलजारचे वैशिष्ट्य होते. गुलजार यांनी सिनेमातील प्रचलित छायावादी प्रतिमेला अव्हेरून काव्याची नवीन जमीन निवडली. गूढ दार्शनिकतेला लोकप्रिय बनविण्याचे कसब शैलेंद्रनंतर गुलजारमध्येच दिसले. लोकजीवनातल्या शब्दांना नवीन अर्थ देणारे काव्य त्यांनी रचले. साहित्याच्या सोपानाने ते सिनेगीतकारापर्यंत पोहोचले. 'मैने तेरे लिये ही सात रंग के सपने चुने सपने सुरीले सपने...'


जीवनाच्या प्रत्येक क्षणावर उदात्त प्रेम करणारे, मृत्यूच्या आधीच मृत्यूचा विचार न करणारे राजेश खन्ना १९७१ सालच्या 'आनंद' चित्रपटात हे गाणे म्हणतात. अशा अवस्थेतील मन:स्थितीच्या मनुजाचे मानस अचूक टिपणारे गुलजार पुढे लिहितात- 'रुठी राते, रुठी हुयी रातोंको मनाया कभी तेरे लिये मिठी सुबह को जगाया कभी' घरगुती मैफलीत, अतिशय दिलखुलास व आनंदाने राजेश खन्ना प्रेयसीच्या आठवणीतले गाणे म्हणून गुलजारच्या शब्दांना जागवितात. या चित्रपटातील खालील आयकॉनिक संवाद गुलजार यांनीच लिहिला आहे. 'बाबु मोशाय, जिंदगी बडी होनी चाहिये, लंबी नही, जिंदगी और मौत उपरवालेके हात मे है, उसे ना तुम बदल सकते ना मै, हम सब तो रंगमंच की कठपुतलीयां है। जिनकी डोर उपरवालेके उंगलीयोमे बंधी हुयी है, कब कोण कैसे उठेगा ये कोई नही बता सकता...' महान कलाकार, गीतकार व संवादामुळे 'आनंद' अमर झाला. यात गुलजारची दोन गाणी व कविवर्य योगेश यांची बाकी गाणी होती. 'दिना एक गाव संपूर्णसिंह एक नाव' असा स्वतःचा परिचय करून देणारे गुलजार नावाप्रमाणेच काव्याच्या उद्यानात आपल्या शब्दसंपत्तीने व कल्पकतेने डवरले होते. त्यांचा जन्म १८ ऑगस्ट १९३६ रोजी पंजाब प्रांतात शीख कुटुंबात झाला. ते १० वर्षांचे असताना फाळणीच्या झळांनी त्यांचे कुटुंब होरपळले व कसेबसे दिल्लीला आले.


मिर्झा गालिबच्या काव्याचे त्यांना बालपणापासूनच वेड होते. त्यासाठी ते उर्दू शिकले. मुंबईत आल्यावर ते बिमल रॉय यांच्या सान्निध्यात आले व त्यांचे सहायक दिग्दर्शक बनले. 'बंदिनी' चित्रपटाद्वारे सिने गीतकार बनले. त्यांच्या यशाची खरी चव ते निर्माता, दिग्दर्शक, पटकथाकार व संवाद लेखक बनले तेव्हा कळली. १९७१ सालचा 'मेरे अपने' हा दिग्दर्शक म्हणून पहिला चित्रपट. त्यात तरुणांतील संघर्ष अप्रतिम उलगडवून दाखविला. 'कोई होगा जिसको अपना' हे गाणे खूप गाजले. १९७२ सालच्या 'परिचय' चित्रपटाद्वारे दिग्दर्शक म्हणून शिक्कामोर्तब झाले. १९७५ सालच्या 'आंधी'तील वरील गाण्यात, गुलजार यांचे मुक्तप्रेम उधळणारे शब्द, संजीव कुमार व सुचित्रा सेन यांच्या मनातल्या अनावर प्रीतीचा प्रत्यय देणारे ठरले. छोट्या व सोप्या शब्दात काव्य लिहिणारे गुलजार यांना दिव्यातील रोशनीचा दृष्टांत फार आवडतो. त्यांच्या अनेक गाण्यात प्रसंगानुसार ते पेरतात. २०१० सालच्या 'स्लम डॉग' या ऑस्कर विजेत्या चित्रपटातील हे 'टायटल ट्रॅक' गाणे गुलजार यांच्या लेखणीतून उतरले व त्यांच्या जीवनात सर्वात मोठे यश मिळाले. ए. आर. रहेमान च्या संगीतात सुखविंदर सिंग, तन्वी शाह व ए. आर. रहेमान यांनी गायलेल्या या गाण्याला आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त झाली. एवढे संवेदनशील गीतकार, दिग्दर्शक व स्त्री जीवनातील क्रांतिकारी स्वरूप चित्रपटात प्रदर्शित करणारे गुलजार स्वतःच्या वैयक्तिक जीवनात तेवढे यशस्वी झाले नाही. प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री राखीसोबतचे वैवाहिक जीवन मेघना या कन्येला जन्म दिल्यावर काही दिवसातच डळमळीत झाले. गुलजार यांना २२ फिल्म फेअर पुरस्कार, साहित्य अकॅडमी पुरस्कार १, अकॅडमी पुरस्कार १, ग्रामी पुरस्कार १, पद्मभूषण पुरस्कार २००४ साली. दादासाहेब फाळके पुरस्कार २०१३ साली मिळाला. गुलजार हे सध्या ९१ वर्षांचे असून आजही ते आपल्या लेखन व काव्य कार्यात सक्रिय आहेत. त्यांचे जीवन असेच यशाने उजळो व त्यांचे योगदान चित्रपटसृष्टीला पुढेही मिळत राहो, हीच सदिच्छा! '

**रमेश पोफळी**

# बॉलीवूडचा नवा 'लव्ह ट्रँगल'!







बॉलिवूडमध्ये लव्ह ट्रँगलवर आधारित अनेक सिनेमे आले. 'कुछ कुछ होता है', 'दिल तो पागल है', 'कॉकटेल' अशी सिनेमांची यादीच आहे. आता जेन झींना आकर्षित करण्यासाठी बॉलिवूडमध्ये फ्रेश त्रिकुट पाहायला मिळू शकतं. रोहित सराफ, राशा थडानी आणि नितांशी गोयल हे तरुण कलाकार आगामी सिनेमात झळकणार असल्याची चर्चा आहे. हा फ्रेश लव्हट्रँगल पाहण्यासाठी चाहतेही उत्सुक आहेत.

रिपोर्टनुसार, 'नीरजा' फेम निर्माते अतुल कसबेकर आणि तनुज गर्ग सध्या रोहित, राशा आणि नितांशी तिघांशी चर्चा करत आहेत. ही एक रोमँटिक लव्हस्टोरी असणार आहे. रिलेशनशिपमधील भाव-भावना, संघर्ष, जिद्द दाखवणारी अशी ही प्रेमकहाणी असणार आहे. निर्मात्यांची कलाकारांशी सुरु असलेली चर्चा आता अंतिम टप्प्यात असल्याचंही कळत आहे. सिनेमाचं दिग्दर्शन कोण करणार यावरही अजून चर्चा सुरु आहे. तसंच सिनेमा फक्त ओटीटी नाही तर थिएटरमध्ये प्रदर्शित करण्याची निर्मात्यांची योजना आहे. लवकरच या प्रोजेक्टची अधिकृत घोषणाही होणार आहे. रोहित सराफ 'मिसमॅच्ड' सीरिजमुळे तरुणाईमध्ये लोकप्रिय आहे. 'चॉकलेट बॉय', 'रोमँटिक हिरो' अशी त्याची प्रतिमा आहे. तर राशा थडानी आणि नितांशी गोयल दोघीही जेन झींच्या आवडत्या अभिनेत्री आहेत. राशाने 'आजाद' सिनेमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. तर नितांशीचं 'लापता लेडीज'मधील अभिनयामुळे खूप कौतुक झालं. ती फक्त १८ वर्षांची आहे.



# शांत राहणं ही सर्वात मोठी ताकद

बॉलीवूड अभिनेत्री ऐश्वर्या राय तिच्या व्यावसायिक आयुष्यापेक्षा वैयक्तिक आयुष्यामुळे जास्त चर्चेत असते. ऐश्वर्या रायने आई झाल्यानंतर मोजकेच चित्रपट केले आहेत. ऐश्वर्या अनेक सार्वजनिक कार्यक्रमांना हजेरी लावते. विविध विषयांवर तिची मतं मांडत असते. एकदा तिने विवाहित महिलांना सल्ला दिला होता. शांत राहणं ही सर्वात मोठी ताकद आहे, असं विधान तिने केलं होतं. अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या बच्चन यांनी करण जोहरच्या शोमध्ये हजेरी लावली होती. या शोमध्ये त्यांनी त्यांच्या वैवाहिक आयुष्याबद्दल चर्चा केली होती. अभिषेकने म्हटलं होतं की जेव्हा जेव्हा त्याचं व ऐश्वर्याचं भांडण होतं तेव्हा तोच आधी बोलतो. कोणताही विवाहित पुरुष माझी परिस्थिती समजू शकतो. कोणतीही पत्नी कधीच आधी माफी मागत नाही. तो हसला आणि म्हणाला, प्रत्येक लग्नात, पत्नी नेहमीच बरोबर असते. अभिषेकच्या वक्तव्यानंतर, ऐश्वर्याने असं उत्तर दिलं की, सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. शांत राहणं ही विवाहित महिलेची सर्वात मोठी ताकद आहे, असं ती म्हणाली. मी हट्टीपणा करण्याबद्दल बोलत नाहीये, तर शांत राहणं प्रेम टिकवून ठेवण्याबद्दल बोलतेय, असं ऐश्वर्याने स्पष्ट केलं होतं. दरम्यान, ऐश्वर्या व अभिषेक यांच्या लग्नाला १८ वर्षे झाली आहेत. दोघेही सुखाने संसार करत आहेत. पण अनेकदा ऐश्वर्या व अभिषेकच्या घटस्फोटाबद्दल अफवा पसरत असतात. अलीकडे तर ऐश्वर्या व अभिषेक अनेकदा एकत्र दिसतात. कामाबद्दल बोलायचं झाल्यास ऐश्वर्या राय शेवटची PS२ सिनेमामध्ये दिसली होती. तेव्हापासून ती कोणत्याही चित्रपटात दिसली नाही किंवा तिने कोणत्याही नवीन चित्रपटाची अद्याप घोषणा केलेली नाही. दुसरीकडे, अभिषेक बच्चन शाहरुख खानच्या 'किंग'मध्ये नकारात्मक भूमिकेत झळकणार आहे.



# राणी मुखर्जीला सगळ्यात जास्त भीती कुणाची?

अभिनेत्री राणी मुखर्जी सध्या तिच्या आगामी चित्रपट 'मर्दानी ३' मुळे चर्चेत आहे. ३० जानेवारीला हा चित्रपट प्रदर्शित होणार असून ट्रेलरला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे. दरम्यान, एका मुलाखतीत राणीने तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल आणि विशेषतः पालकत्वाच्या अनुभवांबद्दल मोकळेपणाने बोलली आहे. एका मुलाखतीत राणी म्हणाली, आजची नवी पिढी म्हणजे जेन अल्फा. अशा मुलीचा सांभाळ करताना थोडी भीती वाटते. मी काहीही बोलले तरी माझी मुलगी अदिरा गप्प बसणार नाही, ती मला उत्तर देईल. आणि ते मला ऐकून घ्यावं लागेल. ती पुढे म्हणाली, आमच्या लहानपणी आम्ही आईला उलट उत्तर दिलं असतं, तर लगेच मार बसला असता. पण मी माझ्या मुलीला मारू शकत नाही. उलट तीच मला मारू शकते, असं म्हणत राणीने हसत-हसत आपली भावना व्यक्त केली. राणीने एक किस्साही सांगितला. राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यावर अदिरा घरात खूप आनंदाने नाचत होती. ते दृश्य मला फार गोड वाटलं. पण तरीही मला तिची थोडी भीती वाटते, कारण ती जेन अल्फा किड आहे, असं राणी म्हणाली. राणीने हेही सांगितलं की तिची मुलगी आईचे सगळे चित्रपट पाहत नाही. मला पडद्यावर रडताना ती पाहू शकत नाही. मी स्क्रीनवर आनंदी असलेले चित्रपट तिला आवडतात. 'हिचकी', 'थोडा प्यार थोडा मॅजिक', 'बंटी और बबली' हे चित्रपट तिला आवडतात. पण 'कुछ कुछ होता है' ती पाहत नाही, कारण त्यात माझा मृत्यू लवकर होतो, असं राणी म्हणाली. मेकअपबाबतही अदिरा खूप स्पष्ट आहे. मी मेकअपमध्ये असताना ती म्हणते तुम्ही माझ्या आईसारख्या दिसत नाही.

मेकअप काढल्यावरच ती म्हणते आता तुम्ही माझ्या आईसारख्या दिसता, असंही राणीने सांगितलं. राणी मुखर्जीने २०१४ मध्ये चित्रपट दिग्दर्शक आदित्य चोपडा यांच्याशी लग्न केलं. २०१५ मध्ये त्यांच्या मुलीचा, अदिराचा जन्म झाला. राणी आणि आदित्य दोघेही आपलं खासगी आयुष्य प्रसिद्धीपासून दूर ठेवणंच पसंत करतात. राणीचा हा अनुभव आजच्या पालकांना नक्कीच आपलासा वाटणारा आहे.

# बापाला लेकाचं कौतुक!



अनुराग सिंग दिग्दर्शित 'बॉर्डर-२' हा सिनेमा नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. १९९७ साली प्रदर्शित झालेल्या बॉर्डर सिनेमाचा हा सीक्वल आहे. सोशल मीडियासह चाहत्यांकडून सनी देओल आणि संपूर्ण स्टारकास्टच्या अभिनयाचे कौतुक होत आहे. याच दरम्यान, बॉलिवूड अभिनेता सुनील शेट्टीने त्याचा मुलगा अहान शेट्टीसाठी एक खास पोस्ट शेअर केली आहे. ही पोस्ट वाचून चाहते देखील भावुक झाल्याचं पाहायला मिळतंय.

अभिनेता सुनील शेट्टीने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये 'बॉर्डर २' चित्रपट रिलीज झाल्यानंतर त्याच्या मुलाच्या भूमिकेचं कौतुक केलंय आणि अहानवर प्रेमाचा वर्षाव केला आहे. सुनील शेट्टीने इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये 'बॉर्डर' आणि 'बॉर्डर २' चित्रपटातील काही अविस्मरणीय क्षण शेअर केले आहेत. प्रिय अहान, आज मी तुला सांगू इच्छितो की माझ्यासाठी 'बॉर्डर' हा फक्त एक चित्रपट नव्हता, तर ती एक जबाबदारी होती. आजही मी ती प्रतिमा माझ्या मनात जिवंत ठेवली. इतक्या वर्षांनी तुला त्या भूमिकेत पाहून ती भावना पुन्हा जिवंत झाली आहे. अभिनेत्याने मग पुढे लिहिलंय, हा चित्रपट केवळ अभिमान किंवा युद्धाबद्दलच बोलत नाही तर शांतता किती महत्त्वाची आहे आणि त्याची किंमत काय आहे याची जाणीव करून देतो. बॉर्डर फक्त अशी जागा नाही जिथे देशाची सीमा संपते. तर तिथे साहसाची कहाणी सुरु होते. काही कथा फक्त पडद्यावर राहत नाहीत, तर त्या देशातील लोकांच्या हृदयात घर करतात.आपण या वर्दीचं महत्त्व कधीही विसरता कामा नये.जय हिंद, जय भारत..., अशी पोस्ट अभिनेत्याने लिहिली आहे. 'बॉर्डर २' हा सिनेमा १९९७ च्या क्लासिक चित्रपट बॉर्डरचा सिक्वेल आहे. यामध्ये सनी देओलसोबत दिलजीत दोसांझ, वरुण धवन आणि अहान शेट्टी यांची प्रमुख भूमिका आहे. हा चित्रपट १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धावर आधारित आहे. बॉर्डर २ मध्ये मोना सिंग, मेधा राणा, सोनम बाजवा आणि अन्या सिंग यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.